# शेतकरी मोर्चेकऱ्यांची निराशा

**भाषणे आणि आश्वासनांव्यतिरिक्त झोळी रिकामीच**

**मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी)ः कृषी कायद्यांना विरोध करण्यासाठी मुंबईत आझाद मैदानावर शेतकऱ्यांचा भव्य मेळावा सोमवार, दि. २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. शेतकऱ्यांच्या या आंदोलनाविरोधात भाजपकडून कडाडून टीका करण्यात आली. या आंदोलनामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेतकरी कामगार पक्षासह किसान सभेचे नेते सहभागी झाले होते. परंतु, 'मविआ'चे नेतृत्व करणाऱ्या शिवसेनेने मात्र याकडे पाठ फिरविली.**

कृषी कायद्यांना विरोध करण्यासाठी दिल्लीत दोन महिने ठाण मांडून असलेल्या शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईत आझाद मैदान येथे सोमवार, दि. २५ जानेवारी रोजी शेतकऱ्यांचा भव्य मेळावा घेण्यात आला. मात्र, केंद्राला दूषणे देणारी नेत्यांची भाषणे आणि आश्वासने या पलीकडे झोळी रिकामीच राहिल्याने शेतकऱ्यांची घोर निराशाच झाली. त्यामुळे शरद पवार यांचे भाषण होताच अनेक मोर्चेकऱ्यांनी घरचा रस्ता धरला. त्यानंतर राहिलेल्या शेतकऱ्यांचा मोर्चा राजभवनाकडे निघाला.



सोमवारी आझाद मैदानात झालेल्या शेतकऱ्यांच्या मेळाव्यात शरद पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, 'किसान सभे'चे नेते हनन मुल्ला यांची भाषणे झाली. मात्र, त्यांनी शेतकऱ्यांना चिथावणी देणारी भाषणे केली. यावेळी माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर, 'सपा'चे नेते अबू आझमी, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप, शेतकऱ्यांचे नेते अशोक ढवळे, डॉ. अजित नवले, जितेंद्र आव्हाड, मिलिंद रानडे, सुनील केदार आदी नेते उपस्थित होते.

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे तयार केले. मात्र, ते कायदे मंजूर करताना बोलू दिले नाही, असा कांगावा करत काही पक्षाच्या नेत्यांनी या कायद्यांना विरोधाचे हत्यार उपसले आहे. त्याद्वारे शेतकऱ्यांची माथी भडकवत त्यांना मुंबईतील आझाद मैदानातील मोर्चात आणले आहे, असे दिसून आले. या मोर्चात धुळे, नंदुरबार, पालघर येथून आलेल्या वनवासी समाजातील शेतकऱ्यांना विचारले असता, ''कृषी कायद्यांना विरोधासाठी मोर्चा आहे म्हणून आम्ही आलो आहोत,'' असे त्यांनी सांगितले. कायद्यातील कोणत्या बाबी जाचक वाटतात, असे विचारता ते त्यांना सांगता आले नाही. मात्र, ''वनजमिनी वनवासींच्या नावे करून मिळतील, म्हणून आम्ही येथे आलो आहोत. आजोबा-पणजोबांपासून शेती करूनही जमिनी अजून आमच्या नावे झालेल्या नाहीत,'' असे ते म्हणाले.

काही शेतकऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांना जमिनी कराराने देण्यास विरोध केला. आज पैसे देऊन आमचा माल घेतील. मात्र, उद्या आमची जमीन लाटतील, अशी त्यांना भीती वाटते. तुमचा शेतमाल विकला जाईल याची खात्री तुम्हाला केंद्र सरकार देत आहे. पुन्हा ते तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे. त्यासाठी कोणतीही सक्ती नाही. तुम्हाला त्या व्यापाऱ्याबरोबरचा सौदा पटणारा नसेल, तर तुम्ही करार करू नये, अशी त्या कायद्यात तरतूद आहे, असे सांगता ते म्हणाले, '' 'जिओ' कंपनीने सुरुवातीला फुकट सीम कार्ड दिले. पण, आता पैसे आकारतात.''

'जिओ' कार्ड घेण्याची सक्ती तुमच्यावर करण्यात येत नाही. तुम्ही कंपनी बदलू शकता, दुसऱ्या कंपनीचे सीम कार्ड खरेदी करू शकता, त्याप्रमाणे पहिल्या व्यापाऱ्याचा वाईट अनुभव आल्यास दुसऱ्या व्यापाऱ्याबरोबर करार करता येईल, असे त्यांना सांगता ते म्हणाले की, ''पण, आमची जमीन लाटली तर करणार काय? त्यापेक्षा सरकारनेच आमचा शेतमाल खरेदी करावा,'' अशी इच्छा काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली. म्हणजे कराराच्या नावाखाली शेतजमीन लाटली जाईल, अशी भीती त्यांच्या मनात घालण्यात आली आहे.

बाजार समितीत तुमची पिळवणूक होत होती. बाजार समितीत ठाण मांडून बसलेल्या व्यापारी आणि अडत्यांकडून तुमची पिळवणूक होत होती. त्यांच्या मनात येईल तो कवडीमोल दर ते तुम्हाला देत होते. आता तुम्ही देशात कुठेही जाऊन माल विकू शकता. त्यामुळे तुम्हाला पैसाही मिळेल, असे विचारता शेतकरी म्हणाले की, ''पण बाजार समित्या बरखास्त होतील ना.'' म्हणजे बाजार समित्यांमधील सत्ता जाऊ नये म्हणून या शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव येणार नाही, अशी भीती घालण्यात आली आहे, असे शेतकऱ्यांशी बोलताना समजते.

## शरद पवारांकडून मोर्चेकऱ्यांची दिशाभूल





''महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आपणास असे राज्यपाल पहिल्यांदाच भेटले आहेत, ज्यांना कंगनाला भेटायला वेळ आहे. मात्र, माझ्या शेतकऱ्याला भेटण्यास वेळ नसून त्यांनी शेतकऱ्यांना सामोरे जायला हवे होते,'' अशी बोचरी टीका पवार यांनी केली. ''राज्यपाल गोव्याला गेले असून शेतकऱ्यांना सामोरे जाण्याइतकी सभ्यता त्यांच्याकडे नाही. त्यांनी नैतिक जबाबदारी घ्यायला हवी होती,'' असे पवार म्हणाले. त्यांच्या टीकेनंतर राजभवन येथून स्पष्टीकरण देऊन पवार यांची टीका खोडून काढण्यात आली.

### राज्यपाल अधिवेशनासाठी गोव्यात

'संयुक्त शेतकरी मोर्चा'चे धनंजय शिंदे यांना २२ जानेवारी रोजी दूरध्वनीद्वारे, तसेच निमंत्रक प्रकाश रेड्डी यांना २४ जानेवारी रोजी लेखी पत्राद्वारे राज्यपालांच्या अनुपलब्धतेबद्दल कळविण्यात आले. शिंदे यांनी 'व्हॉट्स ॲप' संदेशाद्वारे निरोप मिळाल्याचे मान्य केले. तसेच प्रकाश रेड्डी यांना याबाबतचे लेखी पत्र २४ जानेवारी रोजी प्राप्त झाले. त्यामुळे राज्यपालांनी शिष्टमंडळाला भेटीची वेळ देऊन भेट दिली नाही, हे वृत्त चुकीचे आहे. राज्यपालांचे प्रधान सचिव संतोषकुमार शिष्टमंडळाकडून २५ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता निवेदन स्वीकारतील, असेदेखील धनंजय शिंदे यांना पूर्वीच कळविण्यात आले, असे राजभवनातून स्पष्ट करण्यात आले.

### मोर्चामध्ये तृतीयपंथीयही

कृषी कायद्याविरोधात तृतीयपंथीही शेतकऱ्यांच्या मोर्चात सहभागी झाले. नेहमी रेल्वेमध्ये फिरणाऱ्या तृतीयपंथीय शेतकरी मोर्चामध्ये सहभागी झालेले पाहून आश्चर्य व्यक्त करण्यात आले. हातामध्ये फलक घेऊन तृतीयपंथीयही कृषी कायद्यांचा निषेध करीत होते.

### मंगळवारी ध्वजारोहण

मोर्चा संपला असला तरी दूरवरचे मोर्चेकरी रात्रीही आझाद मैदानात थांबले आहेत. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी मैदानामध्ये ध्वजारोहण करून सर्व शेतकरी नेते आणि शेतकरी, कामगार ध्वजाला सलामी देतील, अशी माहिती मोर्चाच्या संयोजकांनी यावेळी दिली.

### कोरोना चाचणी 'निगेटिव्ह'

मुंबईमध्ये दाखल झालेल्या मोर्चेकरी असलेल्या ३२८ शेतकऱ्यांची कोरोना चाचणी करण्यात आली. १८ शेतकऱ्यांना त्रास असल्याचे निदर्शनास आले होते. त्या सर्वांची तपासणी केली असता सर्व शेतकऱ्यांचे रिपोर्ट 'निगेटिव्ह' आल्याचे आढळून आले.

## 'शेतकरी मोर्चा'कडे शिवसेनेची पाठ

**पाठिंब्याऐवजी दिला वडापाव**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे भावनिक आवाहन करत नेहमी शेतकऱ्यांच्या बाजूने कळवळा व्यक्त करत असतात. मात्र, प्रत्यक्ष मदत करताना हात आखडता घेतात, हे महाराष्ट्रात आलेल्या अनेक संकटांत दिसून आले आहे. महापूर, अवकाळी पाऊस, 'निसर्ग' चक्रीवादळ अशी गेल्या वर्षभरात अनेक संकटे महाराष्ट्राने अनुभवली. प्रत्येक ठिकाणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर संकटग्रस्तांच्या मदतीला आधी धावून गेले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या भागाचा दौरा केला. शेतकऱ्यांना शेताच्या बांधावर जाऊन मदत देण्यात येईल, असेही म्हटले होते. मात्र, जाहीर केलेली मदत वेळेत कधी पोहोचली नाही. नंतर केलेली मदत फारच तुटपुंजी होती. तोच अनुभव आज शेतकऱ्यांच्या मोर्चावेळीही आला. ना नेते आले, ना मंत्री आले, सगळ्यांनी पाठ दाखवली आणि शेतकऱ्यांची भूक शमविण्यासाठी वडापाव पाठवून दिल्याचे सांगण्यात आले. रविवारी संध्याकाळपासून आझाद मैदानात धरणे धरलेल्या शेतकऱ्यांचा आज भव्य मेळावा झाला. या मेळाव्यात महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या सर्व नेत्यांनी हजेरी लावली. मात्र, शिवसेनेच्या बड्या नेत्यांनी याकडे पाठ फिरवल्याचे दिसले.

## कृषी कायद्याविरोधात जाणीवपूर्वक ढोंगबाजी : देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आझाद मैदानावरील आंदोलनावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, ''आता काही पक्ष जाणीवपूर्वक ढोंगबाजी करत आहेत. शेतकऱ्यांना भरकटवण्याचा प्रयत्न करत आहेत. शेतकऱ्यांना चुकीच्या गोष्टी सांगितल्या जात आहेत. काँग्रेसने आपल्या २०१९च्या जाहीरनाम्यात बाजार समिती रद्द करा आणि आम्ही निवडून आलो तर बाजार समिती रद्द करू, असे का म्हटले होते, याचे उत्तर मोर्चाच्या निमित्ताने मंचावर जाणाऱ्यांनी व मोर्चाला मदत करणाऱ्यांनी दिले पाहिजे,'' तसेच फडणवीस पुढे म्हणाले की, ''२००६ मध्ये कंत्राटी शेतीचा कायदा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने का मंजूर केला? २००६ पासून २०२० पर्यंत तो महाराष्ट्रात सुरू आहे. महाराष्ट्रातला कायदा चालतो आणि देशातला कायदा का चालत नाही? हा ढोंगीपणा का? याचे उत्तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने द्यावे,'' असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## भेंडीबाजारातील महिला शेतकरी कशा? प्रवीण दरेकर

**मुंबई**: कृषी कायद्याविरोधातील शेतकरी मोर्चावर विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी प्रतिक्रिया देत, ''आजच्या मोर्चात मारून मुटकून आणलेले लोक जास्त, शेतकरी कमी आणि घुसवलेले लोक जास्त होते. भेंडी बाजारातील महिला शेतकरी कधीपासून झाल्या?'' अशी टीका केली. ''काल ज्या महिला आझाद मैदानावर उपस्थित होत्या, त्या महिला भेंडीबाजारातील होत्या, मग त्या महिला आजच्या मोर्चात सहभागी कशा झाल्या होत्या?'' असा सवाल दरेकर यांनी केला. राज्यपालांची अनुपस्थिती व त्यावरील टीकेबाबत ते म्हणाले की, ''शेतकऱ्यांची काही राजकीय पक्षांकडून दिशाभूल होत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे संवेदनशील आहेत. ते सगळ्यांना भेटतात, त्यांच्यावर विनाकारण टीका नको. कोरोना संकटकाळात राज्यपालांचे काम संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. राज्यपालांकडे गोव्याचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असून, गोव्यातील अधिवेशनाच्या कार्यक्रमाचे नियोजन चार महिन्यांपूर्वीच करण्यात आले होते. विधिमंडळाचे कार्यक्रम चार महिन्यांआधी ठरतात, हे सरकारमध्ये असलेल्या नेत्यांना विधानमंडळाच्या नियोजनाची माहिती नाही का? झोपलेल्या लोकांना उठवता येते. परंतु, झोपेचे सोंग घेतलेल्यांना उठवता येत नाही,'' असे म्हणत दरेकर यांनी पवार यांना टोला लगावला. ''शेतकऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून हे आंदोलन चिघळवण्याचा प्रयत्न होतोय, या मंडळींचे शेतकऱ्यांविषयी ढोंग सुरू आहे. पवारांची भूमिका सातत्याने बदलत असते हे सगळ्यांनी पाहिले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिवसेना नेते मोर्चाला न गेल्याने त्यांची भूमिका बदललेली आहे. शिवसेनेने त्यांची भूमिका स्पष्ट करावी,'' असा टोलाही दरेकर यांनी लगावला.



## सेवाभवन कार्यालयाचे खा.पूनम महाजन यांच्या हस्ते उद्घाटन





**मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी)**: वांद्रे पूर्व सिद्धार्थनगर भागामध्ये भाजपच्या सेवासदन कार्यालयाचे उद्घाटन खासदार पूनम महाजन यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी भाजप मुंबई प्रदेश सचिव व माजी नगरसेवक महेश पारकर, युवा कार्यकर्ते प्रवीण घाडगे, नगरसेवक सुषम सावंत, जिल्हा सरचिटणीस नितेश सिंह आदी याप्रसंगी उपस्थित होते.

भाजपची साथ सोडून सरकार स्थापन केलेल्या शिवसेनेला भाजपने 'मातोश्री'च्या भागामध्ये सेवासदन स्थापन करून एकप्रकारे आव्हान दिले आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळामध्ये सुरू आहे. दरम्यान, सेवाभवन जनसंपर्क कार्यालयातून स्थानिक प्रश्न, रोजगार आणि केंद्रातील विविध योजनांचा फायदा करून दिला जाईल, अशी माहिती सेवाभवन कार्यालयाचे प्रमुख प्रवीण घाडगे यांनी दिली.

## शासकीय रुग्णालयांचे 'इलेक्ट्रिकल ऑडिट' करा : विश्वास पाठक



**मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी)**: ''राज्यामधील सर्व शासकीय रुग्णालयांचे 'इलेक्ट्रिकल सेफ्टी ऑडिट' करण्यासाठी 'चार्टर्ड इलेक्ट्रिकल सेफ्टी इंजिनिअर्स'ची त्वरित नियुक्ती करावी. तातडीने शासकीय रुग्णालयांचे 'इलेक्ट्रिकल ऑडिट' करण्यात यावे,'' अशी मागणी ऊर्जा खात्याचे माजी संचालक विश्वास पाठक यांनी सोमवार, दि. २५ जानेवारी रोजी केली.

भंडारा येथे ९ जानेवारी रोजी शासकीय रुग्णालयामध्ये आग लागून दहा नवजात बालकांचा मृत्यू झाला. घटनेनंतर राज्यपाल, मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते यांनी रुग्णालयाला भेटी दिल्या. या घटनेनंतर सरकारकडून राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे दरवर्षी 'इलेक्ट्रिकल सेफ्टी ऑडिट' करण्यात येईल, अशी घोषणा करण्यात आली. परंतु, त्यासंदर्भात अजूनही कोणताही शासकीय निर्णय घेण्यात न आल्याने भाजप नेत्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे निर्णयाची मागणी केलेली आहे.

पाठक म्हणाले की, '' 'इलेक्ट्रिकल सेफ्टी ऑडिट'विषयी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने 'इज ऑफ डुईंग बिझनेस'च्या अंतर्गत 'चार्टर्ड इलेक्ट्रिकल सेफ्टी इंजिनिअर्स'ची नेमणूक करण्याविषयी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत. त्यानुसार, हे इंजिनिअर्स सर्व प्रकारच्या वीजसंच मांडणीचे निरीक्षण करण्यास जबाबदार राहतील. मात्र, महाराष्ट्र शासनाने आजतागायत एकाही 'चार्टर्ड इलेक्ट्रिकल सेफ्टी इंजिनिअर्स'ची नेमणूक न केल्याने अशा प्रकारचे 'ऑडिट' करण्यास अडचणी येत आहेत. राज्य सरकारच्या अस्तित्वात असलेल्या नियमावलीनुसार केवळ ११ केव्ही व्होल्टेजपर्यंत असलेल्या संस्थांचे 'ऑडिट' करण्यासाठी 'चार्टर्ड सेफ्टी इंजिनिअर्स'ला मान्यता दिली आहे. ११ केव्हीहून अधिक व्होल्टेज असलेल्या संस्थांना अशा प्रकारचे 'ऑडिट' करण्यासाठी विद्युत निरीक्षकाकडे जावे लागते जे अतिशय त्रासाचे, खर्चिक व व्यावहारिक नाही, यामुळे भंडाऱ्यासारख्या घटना घडतात म्हणून मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिकरीत्या ताबडतोब लक्ष घालून 'चार्टर्ड इलेक्ट्रिकल सेफ्टी इंजिनिअर्स'ची नेमणूक करावी व राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे 'ऑडिट' करावे.

## शिवसेनेने आम्हाला सल्ले देऊ नयेत : भातखळकर





**मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी)**: '' 'सामना' पुन्हा चिरपला आहे. म्हणे, दाढी वाढवून रवींद्रनाथ होता येत नाही. मोदींना हे माहिती असून मॅरेथॉन मुलाखती देऊनही बाळासाहेब होता येत नाही, हे बहुधा कार्यकारी आणि घरबशा मुख्यमंत्र्यांना ठाऊक नसावे,'' असे प्रत्युत्तर भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी सोमवार, दि. २५ जानेवारी रोजी ट्विटरद्वारे दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवरती शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'तून टीका करण्यात आली. त्याला रोखठोक शब्दात भातखळकरांनी प्रत्युत्तर दिले. भातखळकर म्हणाले की, ''शिवसेनेने मतांच्या तुष्टीकरणासाठी कमरेचे सोडलेले आहे. शिवसेना आता टिपू सुलतान जयंती, उर्दू कॅलेंडर आणि जनाब बाळासाहेब अशी बनत चाललेली आहे. ममतांना, मुस्लीम तुष्टीकरण करू नका, असा सल्ला शिवसेना देताना दिसते. सेनेकडे इतका बेशरमपणा येतो कुठून, असा प्रश्न पडतो आहे. 'सामना'ने दुनियेला सल्ले देण्यापेक्षा राहुल गांधींनी अवघ्या शिवसेनेला जोड्याकडे का उभे केले आहे त्याचा विचार करावा. शिवसेनाप्रमुखांना जयंती दिनी अभिवादन न करणाऱ्या राहुल गांधींना रोज मुखपत्रातून मुजरा करण्याचे शिवसेनेवर दिवस आले आहेत. दुसऱ्यांचे पक्ष फोडून भाजपने राज्याराज्यांमध्ये सत्ता हस्तगत केली, असा 'सामना'कारांनी आक्षेप घेतला. पण, शिवसेनेकडे सरनाईक, मातोंडकर, चतुर्वेदी ही पिलावळ पक्षात कुठून आली?'' असा खोचक प्रश्न त्यांनी शिवसेनेला विचारला आहे.

**PUBLIC NOTICE**

Smt. Suma Madhav Mahajan would like to inform the general public that the allotment letter of Building No. 97, Room No. 3420, Mazeghar Co.Op. Housing Society, Nehru Nagar, Kurla (East), Mumbai - 400024 measuring 450 sq. feet allotted by MHADA under MIG scheme in the name of Shri. Madhav Vishnu Mahajan has been lost/misplaced.

If anyone found, then please return to Smt. Suma Madhav Mahajan. If any objection, inform within 10 days from the publication of this notice or MHADA will issue duplicate allotment letter.

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए ''केंद्रित'' "CENTRAL" TO YOU SINCE 1911
मुख्य कार्यालयः चंद्रमुखी, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, इतर गोष्टींसोबतच **दि. ३१ डिसेंबर, २०२०** रोजी संपलेल्या बँकेच्या तिसऱ्या त्रैमासिक आणि नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि नोंदपटावर घेण्याकरिता बँकेच्या संचालक मंडळाची बैठक **मंगळवार, दि. ०९ फेब्रुवारी, २०२१** रोजी घेण्यात येणार आहे.

ठिकाणः मुंबई
दिनांकः २५ जानेवारी, २०२१

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सही/-
आनंद कुमार दास
उप महाव्यवस्थापक/ कंपनी सचिव

# 'बेस्ट'च्या मदतीला आलेले 'एसटी' कर्मचारी होतात सैरभैर

**प्रवाशांच्या मार्गदर्शनावर चालवतात गाड्या**

« अरविंद सुर्वे »



**मुंबई, दि. २५**: 'बेस्ट'च्या मदतीला राज्यभरातून आलेल्या एसटी गाड्यांवर त्यांचेच कर्मचारी काम करीत आहेत. मुंबईमध्ये अनोळखी असल्याने त्यांच्यावर सैरभैर होण्याची वेळ येते. अखेर प्रवाशांच्या मार्गदर्शनावर त्यांना गाड्या चालवाव्या लागत आहेत.

कोरोना प्रतिबंधासाठी पुकारण्यात आलेल्या 'लॉकडाऊन' मधून शिथिलता मिळाल्यानंतर अत्यावश्यक सेवेसाठी धावणाऱ्या 'बेस्ट'च्या बसेस सर्वसामान्यांसाठीही धावू लागल्या. मात्र, मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या उपनगरीय रेल्वेचे दरवाजे सर्वसामान्य प्रवाशांसाठी अजूनही बंदच आहेत. त्यामुळे प्रवाशांचा भार 'बेस्ट' बसेसवर येत आहे. मात्र, 'बेस्ट'च्या गाड्यांची संख्या मर्यादित असल्याने राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी 'बेस्ट'च्या मदतीसाठी आणि मुंबईकरांच्या सेवेसाठी राज्य परिवहन मंडळाच्या गाड्या पाठवल्या. सुमारे एक हजार 'एसटी' गाड्या मुंबईमध्ये दाखल झाल्या असून, 'बेस्ट'च्या प्रत्येक आगारातून त्या सोडण्यात येतात.

या गाड्यांचे वाहक-चालक केव्हातरी गाडी घेऊन मुंबईमध्ये आले असले तरी थेट मुंबईमधील 'एसटी' आगारांमध्येच येतात. त्यामुळे अंतर्गत रस्त्यांशी त्यांचा संबंध येत नाही. मात्र, 'बेस्ट'च्या मदतीला आणि मुंबईकरांच्या सेवेला दाखल झाल्याने त्यांना ज्या बसचा मार्ग आखून दिलेला असतो, त्याच मार्गाने जावे लागते. घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या मुंबईतील रस्ते त्यांना अनभिज्ञ असल्याने ते पूर्ण भांबावून जातात. कोणत्या मार्गासाठी कुठे वळावे हे त्यांच्या लक्षात येत नाही. त्यातच साशंक चालकाने गाडीचा वेग मंद केला तर मागील टॅक्सी, रिक्षा, खासगी गाड्या यांच्या सतत वाजणाऱ्या हॉर्नमुळे ते अधिकच चक्रावून जातात.

राज्यातील विविध एसटी आगारांतून चालक-वाहक यांची एक बॅच दर १५ दिवसांनी मुंबईमध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी दाखल होत असते. त्यावेळी सुरुवातीला आलेली बॅच निघून जाते. मात्र, नव्या बॅचमधून आलेल्या चालक-वाहकांना मुंबईतील रस्ते नवीन असतात. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'बेस्ट'च्या प्रत्येक आगाराने एकेका फेरीसाठी माणूस पाठविणे आवश्यक आहे. मात्र, नवख्या माणसाला रस्त्यामध्ये सोडून 'या ठिकाणी जा' असे सांगावे, त्याप्रमाणे 'एसटी'च्या नवख्या चालक-वाहकांना गाडीसह रस्त्यावर सोडले जाते. त्यामुळे भांबावलेले 'एसटी'चे चालक-वाहक सुरुवातीचे दोन दिवस प्रवाशांच्या भरोशावरच गाड्या चालवताना दिसतात.

> आम्ही मुंबईमध्ये आलो, तरी राज्य मार्गाने सरळ डेपो गाठतो. अंतर्गत रस्त्यांशी आमचा कधीही संबंध येत नाही. त्यामध्ये मुंबईत दर दोन मिनिटांनी थांबा (स्टॉप) असतो. आम्हाला त्याची काहीही माहिती नसते. त्यामुळे सुरुवातीच्या एक-दोन फेऱ्यांवेळी 'बेस्ट'ने मार्गदर्शक पुरवावा, अशी आमची मागणी आहे.
>
> **- एक एसटीचालक**

**Vinyl Chemicals (India) Limited**

CIN: L24100MH1986PLC039837

Regd. Office: 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel: 2282 2708 Fax: 2204 3969 E-mail: cs.vinylchemicals@pidilite.com Website: www.vinylchemicals.com

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & NINE MONTHS ENDED 31.12.2020**

(₹ In lakhs)

| Particulars | For the Quarter ended | | For the Nine Months ended | |
|---|---|---|---|---|
| | 31.12.2020 | 31.12.2019 | 31.12.2020 | 31.12.2019 |
| | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited |
| Total income | 12711 | 11157 | 23901 | 30452 |
| Profit/(loss) for the period before tax | 648 | 521 | 1007 | 968 |
| Profit/(loss) for the period after tax | 483 | 388 | 748 | 721 |
| Total Comprehensive Income for the period [comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 482 | 388 | 745 | 721 |
| Equity Share Capital (Face value of share: ₹ 1) | 183 | 183 | 183 | 183 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - | - |
| Earnings per share of ₹ 1 each in ₹: | | | | |
| Basic | @2.64 | @2.12 | @4.09 | @3.94 |
| Diluted | @2.64 | @2.12 | @4.09 | @3.94 |

@ For the period only and not annualised

**Notes:**

The above is an extract of the detailed Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Unaudited Financial Results are available on the Websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com and on the Company's Website www.vinylchemicals.com.

Mumbai
Dated: 25th January, 2021

M.B. PAREKH
Chairman & Managing Director
(DIN: 00180955)